# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-४२९-२०२४ दिनांक - १३/११/२०२४

## प्रेस नोट

**“ भाईंदर पोलीस स्टेशनकडुन गोराई पोलीस स्टेशन मुंबई येथे दाखल खुनाच्या गुन्हयातील आरोपीतास ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणुन, आरोपीतास दिले गोराई पोलीस स्टेशन मुंबई पोलीसांच्या ताब्यात ”**

गोराई पोलीस स्टेशन गुन्हा नोंद क्रमांक ६२/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०३, ३३८ मधील अनोळखी इसमाचा अज्ञात आरोपीताने खून करुन, मृतदेहाचे तुकडे करुन, मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचे उददेशाने ते प्लास्टीक डब्यात भरुन, विल्हेवाट लावलेबाबत गुन्हा दाखल आहे.

भाईंदर पोलीस स्टेशन चे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी सपोनि माणिकराव कतुरे, पोउनि प्रसाद गोवले व स्टाफ असे कर्तब्यावर असतांना त्यांना गोराई पोलीस स्टेशन, मुंबई येथील गुन्हा नोंद क्रमांक ६२/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०३, ३३८ या गुन्हयातील आरोपीबाबत गोपनीय माहिती मिळाली. तदनंतर सपोनि माणिकराव कतुरे यांनी वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली संशयीत आरोपीताची माहिती मिळवुन, त्याचा शोध घेवुन, गोपनीय माहितीच्या आधारे संशयीत मोहम्मद सत्तार हनिफ, वय २४ वर्ष, रा. गल्ली नंबर ३, रुम नंबर डी/१२, गणेश देवलनगर, भाईंदर पश्चिम यास ताब्यात घेतले. गुन्हे प्रकटीकरण शाखा, भाईंदर पोलीस स्टेशन यांनी संशयीताकडे सखोल तपास केलेनंतर ताब्यात घेतलेल्या मोहम्मद सत्तार हनिफ, वय २४ वर्ष, व्यवसाय-मासेमारी, रा. गल्ली नंबर ३, रुम नंबर डी/१२, गणेश देवलनगर, भाईंदर पश्चिम याने गुन्हयाची कबुली दिली आहे.

नमुद घटनेच्या अनुशंगाने गोराई पोलीस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक ६२/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १०३, ३३८ गुन्हा दाखल असल्याने आरोपी मोहम्मद सत्तार हनिफ, वय २४ वर्ष, रा. गल्ली नंबर ३, रुम नंबर डी/१२, गणेश देवलनगर, भाईंदर पश्चिम यांस गोराई पोलीस स्टेशन, मुंबई यांचेकडे रिपोर्टसह दिनांक १२/११/२०२४ रोजी ताब्यात दिले आहे.

अशा रितीने मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पांडेय, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. दत्तात्रय शिंदे, मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ श्री. प्रकाश गायकवाड, मा. सहा. पोलीस आयुक्त श्रीमती दिपाली खन्ना यांचे मार्गदर्शनाखाली, वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र कांबळे, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री. महेंद्र निंबाळकर सपोनि/ माणिकरात कतुरे, पोउनि/ प्रसाद गोवले, भाईंदर पोलीस स्टेशन, पोहवा/जितेंद्र उथळे, नेमणुक पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ-१, सपोउनि/अर्जुन जाधव, पोहवा/राजेश श्रीवास्तव, सुशिल पवार, के. पी. पवार, के. आर. पवार, रविंद्र भालेराव, पोना/रामनाथ शिंदे, पोअं. संजय चव्हाण, सलमान पटवे, राहुल काटकर यांनी पार पाडली आहे.